जागतिक महिला दिन विशेषांक-2025
जागतिक महिला दिवस
मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शनिवार, दि. 8 मार्च 2025 | पान- 1



# समानता... संधी अन् सन्मान हवाच!



## डॉ.भाग्यश्री लहाणे-मुंडे : महिला सक्षमीकरणासाठी कृती हवी!

महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना त्यांच्या जीवनावर नियंत्रण ठेवण्यास, निवडी करण्यास आणि निर्णय घेण्यास आणि संसाधने आणि संधींमध्ये समान प्रवेश मिळविण्यास सक्षम करणे. यामध्ये असे वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे, जिथे महिलांना पुरुषांच्या बरोबरीने समाज आणि अर्थव्यवस्थेत सहभागी होता येईल. जिथे त्यांचे आवाज ऐकले जातील आणि त्यांचे हक्क संरक्षित केले जातील. महिला सक्षमीकरण अनेक स्वरूपात असू शकते, ज्यामध्ये शिक्षण, आर्थिक, राजकीय,सामाजिक, आरोग्य,मानसिक यांचा समावेश आहे. शेवटी, महिला सक्षमीकरणाचा उद्देश असा जग निर्माण करणे आहे जिथे महिलांना लिंगभेद किंवा मर्यादांशिवाय त्यांचे जीवन जगण्याची शक्ती आणि स्वातंत्र्य असेल.

महिला सक्षमीकरण, स्त्रीपुरुष समानता यासाठी माझ्या मते अजून आपल्याला बरेच प्रयत्न करायचे आहेत. आमचा विकास तर झालाच आहे. पण सर्वांगीण नाही. समाजाचा काही वर्ग खूप पुढे निघून गेला आहे. परंतु, काही वर्ग मागेच आहे. त्याचा विकास झाला नाही. अजूनही अनेक स्त्रिया अशिक्षित, अंधश्रद्धा, पतीची मारहाण, हुंडा अशा अनेक गोष्टींच्या बंधनात अडकलेल्या आहे. त्यांना परिवर्तनाची दिशा मिळालीच नाहीये. त्यांचा दिवस कोंबडं आरवण्याच्या आधी सुरू होतो आणि रात्रीच्या किरकिर होता संपतो. अजूनही त्या दोन वेळेची भूक भागवण्यासाठी 'ठेविले अनंते तैसिची राहावे' असे म्हणत नवर्याची मारहाण सहन करण्यात अख्खं आयुष्य घालवत असतात. यामध्ये बदल होणे आवश्यक आहे. फक्त काहीच स्त्रियां पुढे गेल्या उर्वरीत स्त्रियांवर आजही हे प्रकार पहायला मिळतात.

### महिला सक्षमीकरणाला अडथळा आणणारे घटक

**पितृसत्ताक वृत्ती :** महिलांपेक्षा पुरुषांना प्राधान्य देणारी पितृसत्ताक वृत्ती अजूनही भारतीय समाजाच्या अनेक भागांमध्ये खोलवर रुजलेली आहे. यामुळे शिक्षण, रोजगार आणि राजकीय सहभाग यासारख्या क्षेत्रात महिलांविरुद्ध भेदभाव होऊ शकतो.

**आर्थिक असमानता :** भारतातील महिला अनेकदा आर्थिकदृष्ट्या वंचित असतात, त्यांना कमी वेतन, मर्यादित नोकरीच्या संधी आणि आर्थिक सेवा आणि संसाधनांमध्ये असमान प्रवेशाचा सामना करावा लागतो.

**हिंसाचार आणि भेदभाव :** महिलांवरील हिंसाचार आणि भेदभाव, ज्यामध्ये घरगुती हिंसाचार, लैंगिक छळ आणि लिंग-आधारित भेदभाव यांचा समावेश आहे, हे भारतातील महिला सक्षमीकरणातील प्रमुख अडथळे आहेत.



> महिला सक्षमीकरण हे एक शाश्वत आणि प्रगतीशील समाज निर्माण करण्यासाठी एक शक्तिशाली साधन आहे. आपल्या देशातील महिलांना अनेक छळ, शाब्दिक गैरवापर, मानसिक छळ, बलात्कार, कामाच्या ठिकाणी भेदभाव इत्यादींचा सामना करावा लागतो. तथापि, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय आणि मानसिक अशा विविध प्रकारच्या सक्षमीकरणाद्वारे महिलांना या अन्यायांपासून स्वतःचे रक्षण करण्यास मदत करणे शक्य आहे.
>
> - डॉ.भाग्यश्री लहाणे-मुंडे.

### ...या गोष्टी होणे आवश्यक

- स्त्री-पुरुष समानता- प्रत्येक घरामध्ये मुला-मुलींमधील भेदभाव नष्ट होणे गरजेचे आहे. मुलींबद्दल आदर आवश्यक आहे. मुलगा म्हणजे वंशाचा दिवा अन् मुलगी म्हणजे परक्याचे धन हे विचार बदलण्याची गरज आहे. मुलींना लेबल लावणे बंद झाले पाहिजे.
- स्त्री-सातंत्र्य- कुटूंबामध्ये एखादा निर्णय घेताना स्त्रियांना विचारात घेतले जात नाही. किंवा तिने एखादा निर्णय स्वतःहून घेतल्यास पुढे त्याची अंमलबजावणी होईल की नाही माहित नसते. त्यामुळे स्त्रियांना निर्णय स्वातंत्र्यता मिळाली पाहिजे. शिक्षण, करिअर, जोडीदार निवडण्यापर्यंत स्वातंत्र्य मिळणे गरजेचे.
- शिक्षण- मुलगी वयात आली म्हणता तिच्या लग्नाचा विचार ग्रामीण भागात सर्रासपणे केला जातो. मग मुलगी कितीही हुशार असो किंवा तिला शिक्षण घेण्याची इच्छा असो त्याला मूरड घालावीच लागते. शैक्षणिक क्षेत्रात दहावी, बारावीमध्ये मुलींचा टक्का सर्वाधिक असतो. त्या मुली नंतर जातात कुठे हा प्रश्न अनेकांना पडतो. बोटावर मोजण्या ऐवढ्याच मुली पुढे येतात.



### महिलांवरील अत्याचार थांबणे गरजेचे

महिला सुरक्षिततेसाठी शासनाने, समाजाने पुढाकार घेऊन वर्क सेफ्टी करून देणे आवश्यक आहे. स्त्रियांवरील अन्याय/अत्याचार दूर करण्यासाठी प्रभावी कायदे आणि त्याची कठोर अंमलबजावणी आवश्यक आहेच, परंतु त्याबरोबरच आवश्य आहे ती जनजागृती. स्त्रियां/मुलींना मार्गदर्शन अत्यंत महत्त्वाचे आहे. आणि शाळा, कॉलेज, स्वयंसेवी संस्था यांनी प्रयत्न करून हे उपक्रम राबवले पाहिजेत.

### ...आता ॲक्शन घ्यायची वेळ

आतापर्यंत महिलां सुरक्षितता, स्त्री-पुरुष समानता, महिलांवरील अत्याचार, आरोग्य शिक्षण याबाबत फक्त बोलणे मोठ्या गप्पा ऐकल्या आहेत. आता खऱ्या अर्थाने ॲक्शन घ्यायची वेळ आली आहे. प्रत्येक महिलांमध्ये जनजागृती आवश्यक आहे. स्वतःपासून, प्रत्येक घरातून ही सुरुवात होणे आवश्यक आहे.

# सकारात्मक विचार हाच यशस्वी जीवनाचा पाया!


## प्रशासन अधिकारी शिल्पा रोडगे : परभणीच्या खेड्यातील विद्यार्थिनींचा प्रेरणादायी



जीवनाशी निगडीत चढ-उतार अनेकदा लोकांच्या दुःखाचे आणि आनंदाचे कारण बनतात. मात्र, जीवनामध्ये आपण नेहमीच चांगले विचार करायला हवे. यामुळे आपल्याला यश मिळण्यास मदत होते. सकारात्मक विचार अन् मिळालेल्या संधीचे सोने ज्याला करायला मिळते तोच खरा यशस्वी होतो. आम्ही मिळालेल्या संधीचे सोनं केले म्हणून शिक्षणक्षेत्रात विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडवू शकलो असे तळेगाव नगरपरिषदेच्या प्रशासन अधिकारी शिल्पा रोडगे यांनी आपल्या मुलखातीत सांगितले.

मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यातील सेलू या छोट्याशा गावांतून आपले शिक्षण क्षेत्रातील स्वप्न साकारणाऱ्या शिल्पा रोडगे यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण नूतन संस्थेच्या कन्या प्रशालेमध्ये झाले. शाळा, शिक्षक खूप चांगले असल्यामुळे शिक्षणात आवड निर्माण झाली. माध्यमिक शिक्षण घेताना शाळा तपासणीसाठी गटशिक्षण अधिकाऱ्यांची शाळेला व्हिजीट होती. शाळेची माहिती, गुणवत्ता या सर्व गोष्टी विचारणाऱ्या त्या अधिकाऱ्याबद्दल, त्यांच्या पोस्टबद्दल कौतुक आणि आकर्षण वाटले,तिथूनच माझे शिक्षण क्षेत्रात काम करण्याचे ध्येय ठरले. शैक्षणिक जीवनात प्रेरणा, ध्येय मिळणे खूप गरजेचे असते. माझ्या जीवनात गटशिक्षण अधिकाऱ्यांची भेट जीवनाला कलाटणी देणारी होती. याशिवाय आई-वडिलांची प्रेरणा अन् आशिर्वाद माझ्यासोबत होते.

शिक्षणक्षेत्रात विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी आपल्याला काम करण्याचे स्वप्न खऱ्या अर्थाने सुरु झाले. पहिल्यांदा महाराष्ट्र राज्यसेवा आयोग वर्ग दोन (महिला बालकल्याण विकास अधिकारी) पदासाठी परीक्षा दिली. त्या निकालानंतर राज्यात दुसऱ्या क्रमांकावर आले. परंतु मला शिक्षण क्षेत्रात काम करायचे होते. बहिणीचे लग्न झाल्याने आई एकटी पडू नये म्हणून सेलूनध्येच बीएड केले. बीएड करताना सोबतचे वर्गमित्र-मैत्रिणी स्पर्धा परीक्षेची तयारी करत होते. त्यावेळी महाराष्ट्र शिक्षण सेवेअंतर्गत परीक्षा परीषदेमार्फत घेतली जाणारी परीक्षा दिली. »»»



मुलाखतीसाठी अमरावतीला नंबर लागला.त्यामध्ये निवड झाली, अन् पहिली पोस्टींग अमरावती विभागात नगरपरिषद पुसद जिल्हा यवलतमाळ प्रशासन अधिकारी या पदावर झाली. नोकरी करत असताना खेळण्याचा छंदही जोपासला मला खेळायची खूप आवड, त्यामध्ये हॉलीबॉल सात वेळा राष्ट्रीय स्तरावर खेळले, सात वेळा अंतरविद्यापीठीय या स्पर्धेत समावेश घेतलेला. टेबलटेनिसच्याही विभाग स्तरीय स्पर्धा खेळल्या आहेत. आताही माझ्या मुलाच्या शाळेत ज्ञानप्रबोधिनी निगडी मध्ये पालकांच्या संघाच्या स्पर्धेत ग्राऊंडवर क्रिकेट, थ्रो बॉल खेळते. नोकरी करताना छंद जोपासल्यामुळे मनाला समाधान मिळते. जीवनात आल्यानंतर आपण समाजाचे काही देणं असतो. आपल्या क्षेत्रात प्रामाणिक काम करून आपण ते समाजाच देणं देऊ शकतो. प्रत्येकाला प्लॅटफॉर्म नसतो, मात्र शासकीय अधिकाऱ्यांना व्याप्त स्वरूपाच्या संधी असतात. माझे शिक्षण क्षेत्र असल्यामुळे मुलांच्या सर्वांगिण विकासासाठी त्यांच्या उज्वल भविष्यासाठी प्रामाणिक कार्य सुरु ठेवले. माझे व्हिजन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये बदल घडला पाहिजे. प्रत्येक विद्यार्थी स्वावलंबी होईल यासाठी प्रयत्न आहे. शाळांना भौतिक सुविधा, शिक्षकांचा गुणवत्ता विकास, विद्यार्थी-शिक्षकांच्या पाठिशी उभे राहणे, विविध सीएसआर फंड आणणे ही कामे आम्ही करतोय. आमच्या शाळेचे विद्यार्थी, तालुका, जिल्हास्तर, राष्ट्रीय स्तरावर ५० मीटर धावणे यामध्ये चमकले आहेत. विशेषतः मुलींची कामगिरी वाखाण्याजोगी आहे. आपल्याकडे जे आहे ते देण्याचा प्रयत्न केल्यास नक्की बदल घडतो. प्रत्येक समस्येला उत्तर असते तुम्ही सकारात्मकता ठेवणे आवश्यक आहे. धडपड करणे जिवतंपणाचो लक्षण आहे. शिक्षणक्षेत्रात आव्हाने खूप आहेत, त्यातील महत्त्वाचे म्हणजे मनुष्यबळाचा आभाव आहे.त्यामुळे अतिरिक्त पदभार सांभाळावे लागतात. अतिरिक्त कार्यभार सांभाळताना शंभर टक्के कुठल्याही कामाला न्याय देता येत नाही. आमच्या क्षेत्रात मनुष्यबळाचा अभाव असल्याने अतिरिक्त कार्यभार अधिक असतो. शासनाची गैरसोय होऊ नये यासाठी तात्पुरती सोय केली आहे. आम्ही वाट बघतोय शंभर टक्के रिक्त पदे भरून शंभर टक्के सेवा द्यावी. शिक्षण क्षेत्रात खूप चांगल्या योजना आल्या आहेत. शासनाचे लक्ष शिक्षणक्षेत्राकडे अधिक आहे. विद्यार्थ्यांसाठी आरोग्य, नगरविकास अशा विविध खात्यांतून योजना दिल्या जात आहेत. विद्यार्थ्यांना परिपूर्ण करण्यासाठी शिक्षकांची गुणवत्ता आणि संख्या वाढणे आवश्यक आहे.



### नोकरी अन् घर यामध्ये 'स्पेस' महत्त्वाची...

चुल आणि मूल याचा ताळमेळ साधताना माझे कुटूंब माझ्या पाठिशी ठामपणे उभे आहे. माझा मुलगा आणि पती यांची मोलाची साथ असल्यामुळे घर आणि नोकरी करणे शक्य झाले. यामुळे चांगले आरोग्य जपता आले. रडत काम करण्यापेक्षा हसत काम केल्यास चिडचिड होत नाही. नोकरी आणि घर या दोन्हींमध्ये एक (स्पेस) आवश्यक आहे, तेव्हाच प्रभावी काम करू शकतो. महिला सक्षमीकरणाबाबत पूर्वीच ॲक्शन घेणे आवश्यक होते. महिला सक्षमीकरणाची सुरुवात ही घरातून होते. शिकलेले आई घर पुढे नेई या वाक्यानुसार आईपासून सक्षमीकरणाला सुरुवात होते. आई सक्षम झाली की, मुलगी सक्षम होणार. प्रत्येक स्त्रीला वेगवेगळ्या टप्प्यावर मान-अपमान सहन करावा लागतो. समाजाने खूप बंधनात दाबून ठेवले कधीही स्फोट होईल.

> अन्याय करणाऱ्यापेक्षा अन्याय सहन करणारा मोठा गुन्हेगार असतो. अन्याया विरोधात तुम्ही बोलून तर बघा, आवाज करून तर बघा नक्की वाट सापडेल. कौटुंबिक स्तरावर न्याय न मिळाल्यास, समाज, शासन यांची मदत घ्या. महिलांवरील अत्याचार हे फक्त ग्रामीण भागा नव्हे तर शहरी भागातील उच्चभ्रु वसाहतीत अधिक आहेत. चांगल्या वाईट अनुभवावरून सकारात्मक रहा आणि मिळालेले काम आनंदाने करा, तरच मानसिक आरोग्य चांगले राहील. मानसिक आरोग्य चांगले न राहील्यास कुठलेच काम करू शकणार नाही.
>
> \- शिल्पा रोडगे, प्रशासन अधिकारी.



# निवडलेल्या क्षेत्रात परिपूर्ण व्हायचे!

## संगीता बांगर-घोडेकर : शिक्षण क्षेत्रातील यशोगाथा

शिक्षण क्षेत्रात अध्यापन ही अत्यंत महत्त्वपूर्ण कृती आहे. नियोजनपूर्वक अध्यापनाचे टप्पे आखताना शिकवण्यातला उत्स्फूर्तपणाही गमावला जाऊ नये, याचे भान उत्तम शिक्षकाला असते. यासाठी शिक्षकाचे विषयावरील प्रभुत्व आणि विषय मांडण्याचे कौशल्य दोन्ही महत्त्वाचे असतात. शिक्षकामध्ये हे गुण अंगी बानवण्याचा एक मूलभूत मार्ग म्हणजे, त्याने त्यासाठी आवश्यक असलेली अर्हता पूर्ण करणे. ही अर्हता पूर्ण करून आईवडीलांचे स्वप्न सत्यात उतरविले. संशोधन क्षेत्रात काम करण्याच्या माझ्या स्वप्नाला मुरड घातली. निवडलेल्या क्षेत्रात परिपूर्ण व्हायचे हे ध्येय ठेवले अन् शिक्षक ते पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शिक्षण विभागात प्रशासन अधिकारी (संगीता बांगर-घोडेकर) या पदापर्यंत झेप घेतली. कुठल्याही क्षेत्रात अथक परीश्रम केले की, यश निश्चित मिळते हे सिध्द करून दाखविले.

महाळुंगे पडवळ हुतात्मा बाबू गेनू ची जन्मभूमी अन् अधिकाऱ्यांचे गाव अशी ओळख माझ्या गावाची आहे. वडिल रयत शिक्षण संस्थेत शिक्षक असल्यामुळे बदली होत असे.रांजणी व महाळुंगे पडवळ येथे दहावीपर्यंतचे माझे शिक्षक झाले. उच्च माध्यमिक शिक्षण म्हणजे बारावीनंतर डीएड चे शिक्षण घेतले. त्यानंतर जिल्हा परीषद पुणे येथे शिक्षक म्हणून १९९३ मध्ये निवड झाली. १९९५ मध्ये कक्षाधिकारी पदासाठी परीक्षा दिली, त्यात यश मिळाले. परंतु शिक्षक व सहाय्यक कक्ष अधिकारीकक्षा अधिकारी याची वेतनश्रेणी सारखी असल्यामुळे ती संधी सोडून दिली.त्यानंतर अण्णासाहेब आवटे महाविद्यालयातून इंग्रजी विषयात पदवीत्तर पदवी प्राप्त केली. माझी शिक्षक म्हणून सेवा शिरोली तालुका खेड तालुका व अवसरी खुर्द तालुका आंबेगाव या ठिकाणी केली. शिक्षक म्हणून सेवा करताना मी स्कॉलरशिप चावडी वाचन वाचन लेखन यांसारख्या विद्यार्थी विकासाच्या वेगवेगळ्याउपक्रमामध्ये सहभागी झाले.

वडिलांच्या नजरेत एक होतकरू शिक्षक मुलगा म्हणून श्री बबन बांगरसर पिंपळगाव खडकी हे स्थळ आले. त्यांच्याशी माझा १९९८ मध्ये विवाह केला. त्यानंतर २००० मध्ये मुलगी आणि २००४ मध्ये मुलगा झाली. सासू-सासरे, मुलगा-मुलगी, सर्वांचे करून नोकरी करत होते. तारेवरची कसरत होत होती. परंतु कुटुंबाच्या साथीमुळे मी ही जबाबदारी योग्यरीता पार पडली. 2004 वर्षी मी नियमित कॉलेज करून बीएड ही सावित्रीबाई फुले विद्यापीठाची पदवी प्राप्त केली .या दरम्यान तब्बल 14 वर्षांनी उपशिक्षणाधिकारी वर्ग २ ची 2008 मध्ये जाहिरात आली. बीएड केल्यानंतर तीन वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असल्यामुळे मी या परीक्षा पात्र ठरत होते म्हणून मी परीक्षा देण्यासाठी तयारी सुरु केली. ही माझ्या आयुष्यातील शेवटची व महत्त्वपूर्ण संधी होती. कुटूंब व नोकरी सांभाळून वेळ मिळेल तसा अभ्यास केला. २००८ मध्ये



उपशिक्षणाधिकारी पदासाठी परीक्षा दिली. परंतु परीक्षेचा निकाल लांबला गेला. त्यादरम्यान जिल्हा परिषद पुणे यांची विस्तार अधिकारी शिक्षणची जाहिरात आली. उपशिक्षणाधिकारी परीक्षेची माझी तयारी झाली असल्यामुळे मी पहिल्या रँकने शिक्षण विस्ताराधिकारी म्हणून निवड झाली. दोन वर्ष 2009 ते 2011 या कालावधीत मी आंबेगाव तालुका मधील शिनोली, तळेकर, आसाने या भागात विस्तार अधिकारी म्हणून काम केले. शिक्षकांना व शिक्षणामध्ये नवीन नवीन प्रयोग करून गुणवत्ता शिक्षण कसे होईल याबाबत उपक्रम राबवले 2011 मध्ये माझी प्रथम नियुक्ती वेल्हे पंचायत समिती जिल्हा पुणे येथे गटशिक्षणाधिकारी म्हणून नियुक्ती झाली. वेल्हे तालुका अतिशय दुर्गम तालुका आहे या तालुक्यामध्ये धरणाच्या आत मध्ये ही शाळा होत्या या सर्व शाळांमध्ये शौचालय व भौतिक सुविधा शाळा बांधकाम याबाबत मी उत्कृष्ट काम केले.

शिक्षणाचा दर्जा उंचवण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची प्रशिक्षण शिक्षकांना देणे, 2013 मध्ये माझी बदली महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे येथे अधिव्याख्याता म्हणून झाली. या संस्थेत मी अभ्यासक्रम विकसन विभाग या विभागात काम केले या कालावधीत मी इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत नवीन अभ्यासक्रम निर्मिती व त्यात शिक्षकांचे प्रशिक्षण घेणे याबाबत काम केले. शिक्षण क्षेत्र हे समाजासाठी मार्गदर्शक असं क्षेत्र समजलं जातं त्यातील शिक्षक घडवताना व विद्यार्थी घडवताना त्याबाबतची पुस्तके व अभ्यासक्रम याची उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून आम्ही अभ्यासक्रम निर्मिती करत होतो एकविसाव्या शतकातील अनुभव देणारा विद्यार्थी घडव ण्यासाठी अभ्यासक्रमामध्ये जे बदल घडवणे आवश्यक होते ते या विभागात काम करत असताना मी केले आहे.

### चुल आणि मुल या चक्रामध्ये तारेवरची कसर...

चुल आणि मुल या चक्रामध्ये तारेवरची कसरत होती, मात्र मला पतीची व कुटुंबाची भक्कम साथ होती . मुलांनी आईला वेळोवेळी समजून घेतल्यामुळे हा सारा प्रवास सुखकर झाला. मुलांचा अभ्यास, कुटूंबातील जबाबदाऱ्या पार पाडताना माझे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य उत्कृष्टरित्या पार पाडत होते. 2017 मध्ये माझी बदली शिक्षण संचालक कार्यालय पुणे येथे झाली तेथे माझ्याकडे अपंग समावेशी शिक्षण हा अत्यंत किचकट विषयाची संपूर्ण राज्याची जबाबदारी देण्यात आली. ही जबाबदारी उत्कृष्ट रित्या पूर्ण केली. 2022 मध्ये मला शिक्षणाधिकारी म्हणून पदोन्नती मिळाली. यामध्ये मी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद येथे सहाय्यक आयुक्त या पदावर दोन वर्षे काम केले. या ठिकाणी संपूर्ण राज्याच्या स्कॉलरशिप परीक्षा, टायपिंग परीक्षा ,डीएड परीक्षा या विभागात काम केले. फेब्रुवारी 2024 मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासनाधिकारी म्हणून रूजु झाले. या ठिकाणी एक कर्तव्यदक्ष प्रशासनाधिकारी म्हणून काम बजावत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शाळा गुणवत्तेमध्ये उत्कृष्ट कशा होतील तसेच गुणवत्ता विकासासाठी वेगवेगळे उपक्रम राबवणे स्कॉलरशिप परीक्षांमध्ये अधिकाधिक विद्यार्थी गुणवत्ता यादीत येतील यासाठी उपक्रम राबवणे शिक्षक सक्षमीकरण यासाठी प्रशिक्षण आयोजित करणे, इंग्रजी विषय शिक्षण व मुख्याध्यापक सक्षमीकरणासाठी लीडरशिप प्रोग्राम च्या कार्यशाळांचे आयोजन करणे हे सर्व उपक्रम मी प्रशासन अधिकारी म्हणून पूर्ण करत आहे.



**“ महिला म्हणजे केवळ कुटुंबाचा आधार नसून आईवडिलांचे स्वप्न पूर्ण करण्याची जिद्द ठेवली होती. माझ्या यशातून आईवडिलांची मान अभिमानाने उंचावली आहे कुठल्याही क्षेत्रात यश मिळवण्यासाठी चिकाटी, सातत्य बाळगणे आवश्यक असते. संयम बाळगणे, नम्र राहणे आवश्यक आहे. जीवनात आलेल्या आव्हानांचा न डगमगता सामना करणे आवश्यक आहे. महिलांना संसार अन् नोकरी करताना तारेवरची कसरत करावी लागते. मात्र स्वतःचे अस्तित्व निर्माण करण्याची आजच्या काळात गरज आहे**

**- संगीता बांगर-घोडेकर, प्रशासन अधिकारी, पिंपरी-चिंचवड महापालिका.**



# प्रतिभावंत विद्यार्थी घडवणारी 'शिल्प'कार!

## शिल्पा कोटकर यांची शिक्षण क्षेत्रातील उत्तुंग भरारी

आयुष्याला कलाटणी देणारी प्रेरणा,ध्येयापूर्तीसाठी मार्ग दाखविणारी दिशा...कधी बिकट परिस्थितीत, प्रेमाची साथ... तर कधी पाठीवरील शाबासकीचा हात, कधी कौतूकाचे गोड शब्द... तर कधी हातावर बसणारा छडीचा मार...हे सर्व अनुभव आल्याशिवाय चांगला विद्यार्थी घडू शकत नाही. याच विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी अन् चांगल्या शिक्षणासाठी महर्षी डॉ. डॉ. वाय. पाटील शिक्षण संस्थेतील कोटकर दाम्पत्य यांनी पुढाकार घेतला. संस्थेचे अध्यक्ष अभय कोटकर आणि सचिव शिल्पा कोटकर यांची शिक्षणक्षेत्रातील झेप तरूणांसाठी प्रेरणादायी आहे.

शिक्षणमहर्षी डॉ.डी.वाय.पाटील शिक्षण संस्थेची स्थापना १९९५ मध्ये झाली. सर्वांगीण शिक्षण देणारा ग्रुप म्हणून या समूहाकडे पाहिले जाते. डॉ.डी.पाटील. समूहाकडे संपूर्ण भारतातील २०० आणि महाराष्ट्रातील ४ संस्थासोबत तीस वर्षाचा शिक्षणाचा अनुभव आहे. जगभरातील दोन लाखांहून अधिक हूशार विद्यार्थी आणि पाच लाखाहून अधिक माजी विद्यार्थी आहेत. हे एक हजाराहून अधिक अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले आहे. शिक्षण संस्थेचा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना कॉर्पोरेट जगातील आव्हाने आणि संधीना सामोरे जाण्यासाठी कौशल्याने सुसज्ज करण्यासाठी डिझाईन केलेले आहेत.

### बौद्धिक- वैयक्तित विकासाला चालना...

संस्थेचे शिक्षण मॉडेल हे व्यावसायिक, बौध्दिक आणि वैयक्तिक विकासाला चालना देणारे आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षित भविष्यासाठी उत्तम शिक्षण महत्तावाचे आहे. शंभर टक्के निकाल दरवर्षी शिक्षण संस्था देते. शिक्षणमहर्षी डॉ..डी.वाय.पाटील शिक्षण संस्थेतर्फे चालविले जाणारे इतर अभ्यासक्रम म्हणजे कला,वाणिज्य आणि विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, डॉ.डॉ.पाटील कॉलेज ऑफ कॉम्प्युटर ॲन्ड बिझनेस स्टडीज (बीबीए आणि बीसीए) पुणे विद्यापीठाशी संलग्न आणि डॉ.डॉ.वाय पाटील सेंटर फॉर मॅनेजमेंट ॲड रिसर्च (एमबीए) (एआयसीटीईद्वारे मंजूर, पुणे विद्यापीठाशी संलग्न आणि महाराष्ट्र सरकारद्वारे मान्यताप्राप्त) शिक्षणमहर्षी डॉ.डॉ.वाय पाटील शिक्षण संस्था केजी ते पीजीपर्यंतचे शिक्षण देते. या शिक्षण संस्थेमध्ये आधुनिक युगाच्या साऊ म्हणजे सावित्रीबाई म्हणून शिल्पा कोटकर कार्यरत आहेत.

### अभय कोटकर यांची खंबीर साथ...

पती अभय कोटकर यांच्या खंबीर साथीमुळे शिक्षणक्षेत्रात वेगळी ओळख वेगळा ठसा उमटविण्याचे काम शिल्पाताईंनी केले आहे. चिखलीतील नामांकित शिक्षण संस्था म्हणजे बर्डस इंटरनॅशनल स्कूल च्या भक्कम आधारस्तंभ म्हणजे शिल्पा कोटकर यांच्याकडे पाहिले जाते. स्कूल नावारूपास आणण्यासाठी त्यांनी मोठी मेहनत घेतली. या संस्थेचे उदिष्ट म्हणजे परिसरातील मुलांना दर्जेदार शिक्षण देऊन भारताचे उज्ज्वल भविष्य घडवणे आहे. स्कूलमध्ये नैतिक मानके विद्यार्थ्यांमध्ये बिंबवली जातात. तसेच अत्याधुनिक सुविधा आणि संधी देऊन त्यांचा सराव करण्याचा प्रयत्न करतो. आणि मुलांचा सामाजिकदृष्ट्या जबाबदार नागरिक म्हणून विकास करतो. मुलांच्या शैक्षणिक सर्जनशील, वैयक्तिक, शारिरीक, नैतिक आणि अध्यात्मिक विकासामध्ये पूर्ण क्षमता करू शकतात. शाळेमध्ये शासनाने घालून दिलेल्या सर्व नियमांचे काटेकोर पालन केले जाते.

### विविध क्षेत्रात ठसा...

शिक्षण संस्थेची जबाबदारी पार पाडताना शिल्पा कोटकर यांनी कुटूंबाची जबाबदारीही चोख पध्दतीने पार पाडली आहे. आपल्या दोन्ही मुलांना चांगले संस्कार, चांगल्या-वाईट गोष्टींची जाणीव अन् चांगले शिक्षण दिले. कोटकर दाम्प्त्यांनी शिक्षण क्षेत्रात योगदान देताना मुलांचेही चांगले पालनपोषण केले. स्वतःची वेगळी ओळख, वेगळा ठसा उमटविण्यासाठी महिलांना कुटूंब आणि नोकरी किंवा व्यवसाय करताना तारेवरची कसरत करावी लागते. सुरुवातीचा काळ संघर्षाचा असतो. मात्र या संघर्षामध्ये सुख, समाधान असते. कारण यातून स्त्रीचे अस्तित्व अन् वेगळी ओळख उभी होते. अथक परिश्रमाने, त्यागाने आणि प्रेमाने संपूर्ण समाज घडतो. महिला केवळ घराची जबाबदारीच सांभाळत नाहीत, तर त्यांनी प्रत्येक क्षेत्रात स्वतःचे एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, कला, क्रीडा, राजकारण, व्यवसाय अशा विविध क्षेत्रांमध्ये त्यांनी स्वतःचा ठसा उमटवला आहे.

"जीवनात अपयश आल्यावर खचून न जाता गरज असते पुन्हा नव्याने प्रयत्न करण्याची गरज असते. जिद्द अन् चिकाटीच्या जोरावर यश नक्कीच मिळते. सध्या गरज आहे संयमाची, संयम असेल तर सर्व गोष्टी हळूहळू सुरूळीत होतात. कुठल्याही क्षेत्रात यशस्वी व्हायचे असेल तर प्रामाणिकपणा, स्वतःवरील विश्वास, संयम, जिद्द अन् चिकाटी ठेवा यश फार दूर नाही. छोट्या-छोट्या गोष्टींवरून खचून जाऊ नका ऐवढेच यातून सांगेल.

- शिल्पा अभय कोटकर, सचिव –
शिक्षणमहर्षी डॉ.डॉ.वाय.पाटील शिक्षणसंस्था.

जागतिक महिला दिन





# संस्कार अन् राष्ट्रवादी विचारांची "कविता"

## प्रा. कविता आल्हाट यांची प्रेरणादायी वाटचाल

भारतीय राजकारणात महिलांची प्रगती खरोखरच प्रेरणादायी आहे. विविध क्षेत्रांतील उच्च पदापर्यंत पोहोचण्यासाठी महिलांनी केलेला दृढनिश्चय आणि त्यासाठी त्यांनी केलेले अविरत प्रयत्न हा नारीशक्तीचा पुरावा होय. भारतीय राजकारणातील अतुलनीय प्रवासाद्वारे या महिलांनी कर्तृत्वाची नवी शिखरे पादाक्रांत केली. त्यामध्ये अनेक महिलांची नावे समोर येतात. त्यातील एक म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या शहराध्यक्ष प्रा. कविताताई आल्हाट आहेत. प्राध्यापिका, उत्कृष्ट खेळाडू ते राजकारणातील यशस्वी वाटचाल सर्वांसाठी प्रेरणादायी आहे.

प्रा. कविताताई आल्हाट यांना माहेरून राजकारणाचा वारसा होता. सासरचे कुटूंब उच्चशिक्षित मात्र राजाकारणाचाही अनुभव असलेले आहे. कबड्डीमध्ये राष्ट्रीय स्तरावर खेळाडू म्हणून गाजलेल्या, प्रशिक्षक म्हणूनही त्यांनी काम पाहत आहेत. सध्याच्या पिढीला इंटरनेटच्या जाळ्यातून बाहेर काढून मातीची जाणीव व्हावी म्हणून लक्ष्यवेध स्पोर्टस फाऊंडेशनची मोशीमध्ये स्थापना केली. या फाऊंडेशनच्या माध्यमातून अनेक खेळाडू निर्माण केले आहेत. तसेच डी.वाय.पाटील या शिक्षण संस्थेत १७ वर्षे प्राध्यापिका म्हणून काम केले. एम.ए.एमपीएड आणि एनआयएस या पदव्या मोठ्या कष्टाने त्यांनी मिळविल्या आहेत. या दोन्ही क्षेत्रात वाटचाल सुरु असतानाच त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या निरीक्षक पदाची जबाबदारी आली. आलेली जबाबदारी चोख पार पाडली. त्यानंतर शहराध्यक्ष पद ही मोठी जबाबदारी पक्षाने दिली. पक्षाचे विचार, भूमिका तळागाळापर्यंत पोहचविण्यासाठी, संघटन टिकविण्यासाठी त्या उत्कृष्ट भूमिका पार पाडत आहेत. शहरामध्ये विविध पक्षाच्या महिला शहराध्यक्षा आहेत, मात्र राजकारणातील आपला वेगळा ठसा, वेगळी भूमिका, संघटन कौशल्य यामुळे प्रा. कविताताई आल्हाट यांचे कार्य दखल घेण्यासारखे असते. त्यांच्या राजकारणातील वाटचालीमुळे, विचारांमुळे अनेक महिला राजकारणात काम करण्यासाठी पुढे सरसावल्या आहेत.

### कुटुंब भक्कम पाठीशी...

प्रा.कविताताई आल्हाट यांच्याकडे शहराध्यक्ष पद असल्याने शहरातील कुठल्याही महिलांवर अन्याय, अत्याचार झाल्यास त्यांना न्याय मिळाविण्यासाठी महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपालीताई चाकणकर यांच्यामार्फत न्याय मिळवून दिला जातो. रूपालीताई चाकणकर यांच्या कट्टर समर्थक आणि निकटवर्ती म्हणून प्रा. कविताताईं यांच्याकडे पाहिले जाते. त्यांच्या यशस्वी राजकीय वाटचालीमागे त्यांचे पती उद्योजक संदेश आल्हाट आणि त्यांचे कुटूंब भक्कमपणे पाठिशी उभे असते.



### समाजासाठी लढण्याची इच्छाशक्ती...

चुल आणि मुल या वर्तुळाबाहेर पडत कामाचा ताळमेळ घालताना तारेवरची कसरत करावी लागते. यावेळी आपले आरोग्य, आपले खाण-पान याला दुय्यम स्थान मिळते. प्रत्येक स्त्री कुटूंबातील प्रत्येक सदस्यांचा प्रथम विचार करते. मुलांच्या संगोपनापासून ते सासू-सासऱ्यांच्या जबाबदाऱ्या या सर्व गोष्टी सांभाळून स्वतःचे अस्तित्व उभे करावे लागते. यासर्व गोष्टी करताना महिलांनी प्रथम प्राधान्य आपल्या आरोग्याला दिले पाहिजे. आपल्या फिटनेस ला दिले पाहिजे. आपण शारीरिकदृष्ट्या फिट असल्यास सर्व गोष्टी सहज शक्य होतात. चुल आणि मुल या वर्तुळाबाहेर काम करतानाही कसरत करावीच लागते. मात्र स्वतःसाठी, समाजासाठी आपण काम करतोय, आपली वेगळी ओळख जपतोय याचे समाधान खूप वेगळे असते.

### राजकारणात महिलांचे स्थान काय?



सगळ्या क्षेत्रात मोठय़ा संख्येने दिसणाऱ्या स्त्रिया फक्त एकाच क्षेत्रात तुलनेत खूपच कमी प्रमाणात आहेत. ते क्षेत्र म्हणजे राजकारण. लोकसभा, विधानसभेत 33 टक्के आरक्षण मिळाले असले तरी त्याची अमलबजावणी प्रत्यक्षात 2029 च्या निवडणुकीपासून होणार आहे. तर, स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये 33 टक्के इतके असलेले आरक्षण 50 टक्के इतके झाले आहे. मात्र, महिलांना आरक्षण जाहीर होऊनही महिलांची राजकारणात येण्याची उदासीनता दिसते. याची काही प्रमुख कारणे आहेत. आधी अंगावर पडलं आणि नंतर अंगवळणी पडलं म्हणून आता स्त्रियांचे प्रमाण हळूहळू वाढत आहे. पण, त्याआधी नवऱ्याची जागा राखीव झाली, त्याच्या जागी पत्नीला उमेदवारी, त्यामुळे नवऱ्याचा किंवा पक्ष नेत्यांचा रबर स्टॅम्प अशी त्यांची ओळख होती. मात्र, सामाजिक संघटनांकडून प्रशिक्षण मिळाल्यामुळे, राजकारणाचा आवाका आणि त्यातून जनतेची होणारी कामे याचा अनुभव आल्याने आता स्वत:हून पुढे येऊन राजकारणात सहभागी होणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढली आहे.

> महिलांना एकच सांगू इच्छिते क्षेत्र कुठलेही असो स्वतःवरील आत्मविश्वास, कठीण परीश्रम, स्वप्न ती नसतात जी तुम्हाला झोपल्यावर पडतात, स्वप्नं ती असतात जी तुम्हाला झोपू देत नाहीत. त्यामुळे आपल्या स्वप्नांना सत्यात उतरविण्यासाठी जिद्द, कष्ट, प्रामणिकपणा, कामातील सातत्य ठेवा. जोपर्यंत आपण हरण्याचा विचार करत नाही तोपर्यंत आपल्याला कोणीही हरवू शकत नाही. हे एकदा मनाशी पक्के केले की आपण जिंकणार हे नक्की यशस्वी होणार.

**- प्रा. कविताताई आल्हाट, शहराध्यक्षा, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पिंपरी-चिंचवड.**







# अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा!

## ॲड. सारिका परदेशी : संविधान जागृतीसाठी प्रयत्नशील

न्यायव्यवस्था हे भारत सरकारचे तिसरे अंग...सर्वसामान्यांचा न्यायव्यवस्थेवर विश्वास बसावा...कायद्यांविषयी जागरूकता निर्माण व्हावी...गरीब,वंचित दुर्बल घटकांना कायद्याचा आधार मिळावा... अन्यायांविरूध्द लढा उभारून न्याय मिळावा...या सर्व गोष्टींसाठी अन् आलेल्या अनुभवानंतर ॲड. सारिका परदेशी यांनी वकीली क्षेत्राची निवड केली. आतापर्यंत हजारो निरपराधांना न्याय मिळवून दिला. वकिली व्यवसाय हा नोकरी नसून ती एक जबाबदारी अन् सामाजिक बांधिलकी असल्याचे विचार त्यांनी कर्तव्यातून दाखवून दिले. त्यांच्या कार्याचा आदर्श इतरांनाही प्रेरित करतो.

ॲड. सारिका परदेशी यांचे मूळ गाव चाकण, याठिकाणी त्यांचे शिक्षण झाले. उच्च शिक्षण पुण्यात आय.एल.एस मध्ये झाले. शाळा अन् महाविद्यालयीन जीवन अतिशय शिस्तबध्द होते. शिक्षणासोबत छंद ही जोपासले. वकिली क्षेत्र निवडण्यामागचे कारण म्हणजे अन्याय सहन करण्याची मानसिकता आपल्यात कधीच नव्हती. वडिलांना कोर्टात होणारा त्रास जवळून पाहिला होता. तेव्हाच मनाशी ठाम ठरवले होते. अन्यायविरूध्द लढायचे, दुर्बल, अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून द्यायचा. त्यामुळे वकिली क्षेत्रात जाण्याचा निर्णय घेतला. वकिली क्षेत्र हे प्रतिष्ठित अन् जबाबदारचा व्यवसाय करणारे क्षेत्र आहे. शंभर अपराधी सुटले तरी चालतील पण एकाही निरपराध व्यक्तीला शिक्षा नाही झाली पाहिजे यासाठी डोळ्यात तेल घालून काम करावे लागते. आजच्या काळात कायद्याच्या क्षेत्रात मोठे बदल होत असून, वकिलांसाठी नवीन संधीही निर्माण होत आहेत.






### कठिण स्पर्धा अन् स्थिरस्थावर होण्याच्या अडचणी...

नवीन वकिलांसाठी स्थिरस्थावर होणे सोपे नाही. कारण अनुभव असलेल्या वकिलांकडे जास्त विश्वास दिला जातो. मोठ्या कायदेशीर फार्म अन् अनुभवी वकिलांशी स्पर्धा करावी लागते.

### न्यायप्रक्रियेतील विलंब

भारतीय न्यायव्यवस्था संथ असून, प्रकरणे दिर्घकाळ प्रलंबित राहतात. अशीलाच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी वेळेवर निकाल आवश्यक असतो, मात्र न्यायालयीने प्रक्रियेतील विलंब हो मोठा अडथळा ठरतो आहे. नवोदित वकिलांना सुरुवातीच्या काळात मोठे उत्पन्न मिळत नाही. त्यामुळे आर्थिक स्थैर्याचा अभाव या क्षेत्रात आहे.

### वकिली क्षेत्रातील संधी...

या क्षेत्रामध्ये संधी चांगल्या आहेत. फौजदारी वकिली- गुन्हेगारी प्रकरणांसाठी वकिलांची मोठी मागणी आहे. नागरी वकिली- मालमत्ता, करार, कौटुंबिक वाद अशा प्रकरणांसाठी मोठी संधी आहे. कॉर्पोरेट लॉ- कंपन्यांसाठी कायदेशीर सल्लागार म्हणून मोठी संधी उपलब्ध आहे. सायबर लॉ- डिजिटल फसवणूक हॅकिंग यासारख्या प्रकरणांमध्ये तज्ज्ञ वकिलांची गरज वाढते आहे. न्यायपालिका अन् सरकारी क्षेत्रात संधी आहेत. उद्योजक वकिल म्हणून चांगल्या संधी आहे. वकिली क्षेत्रात जागतिक स्तरावर काम करण्याची संधी मोठी आहे. माझ्या क्षेत्रातील ध्येय म्हणजे सर्व सामान्य माणसांचा न्यायव्यस्थेवर विश्वास वाढवणे, लोकांना कायद्याविषयी जागरूकता निर्माण करणे.गोरगरीब, वंचित दुर्बल घटकांना कायद्याचा आधार मिळवून देणे, खोट्या अन् चुकीच्या केसेसना विरोध करून न्यायसंस्थेचा दुरुपयोग टाळणे.नैतिकता अन् प्रामाणिकपणा जोपासून सत्यता याला महत्त्व देणे.वकिली व्यवसायात नाविन्य आणि तंत्रज्ञानाचा वापर करणे. उदा- ई-कोर्ट, ऑनलाईन सल्ला सेवा, डिजिटल कायदेशीर साधने यांचा वापर करणे. आर्टिफिशियल  इंटेलिजन्स आणि कायदा यामधील नवीन संधी शोदणे आहेत.

चुल आणि मूल या वर्तुळाबाहेर पडत कामाचा ताळमेळ घालताना असे सांगेल कुटूंबाची साथ असेल तर महिला ही आपल्या कार्यक्षेत्रात आपले वेगळे अस्तित्व वेगळा ठसा उमटवू शकतात. महिलांवर घरगुती जबाबदाऱ्या मोठ्या प्रमाणात असतात. मुलांना मोठे करण्याची सर्वात मोठी जबाबदारी पार पाडावी लागते. मात्र आजच्या काळात हे सर्व सांभाळून स्त्रिया करिअरलाही प्राधान्य देत आहेत. हे करत असताना, तारेवरची कसरत त्यांना करावी लागते. मात्र स्वतःची वेगळी ओळख, वेगळा ठसा उमटविण्यासाठी ही सर्व धडपड स्त्री करते आहे. महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना शिक्षण, रोजगार, आरोग्य सेवा, कायदेशीर हक्क अन् सामाजिक सन्मान मिळवून देण्याची प्रक्रिया आहे. आताच्या घडीला महिलांना सक्षम बनवणे पर्याय नाही तर गरज आहे. महिला सक्षम म्हणजे समाजाची प्रगती वेगाने होते. अजूनही अनेक ठिकाणी महिलांना शिक्षण, संपत्ती, अन् निर्णय प्रक्रियेत समान संधी दिल्या जात नाहीत. महिलांना समान संधी देणे म्हणजे लोकशाहीची मूल्ये जपणे आहे.

महिला सक्षमीकरणासाठीच्या उपायांमध्ये स्त्री शिक्षणावर भर देणे, सुरक्षा अन् कायद्याची अंमलबजावणी, स्त्री उद्योजकतेला चालना देणे, सामाजिक अन् मानसिकता बदलने आवश्यक आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कायदेशीर प्रक्रियेत महिलांवर झालेल्या अन्यायाच्या खटल्यांबाबत कठोर अमंलबजावणी करणे आहे. ज्यातुन महिलांवर होणाऱ्या अत्याचारास प्रतिबंध करता येऊ शकेल. नवोदीत महिला उद्योजकांना एकच सांगू इच्छिते की, तुम्ही ज्या मार्गावर चालत आहात तो सहज अन् सोपा नसला तरी तो प्रेरणादायी आहे. तुमचे स्वप्न, तुमचा आत्मविश्वास अन् तुमची मेहनत हेच तुम्हाला यशस्वी बनवते. स्वतःवर विश्वास ठेवा, अपयशाला घाबरू नका, शिक्षण अन् कौशल्य ही तुमची खरी ताकद आहे. संकटांना संधीमध्ये बदला, जनसंपर्क करा अन् एकमेकींना मदत करा, संतुलन साधा, कधीही हार मानू नका हेच सांगू इच्छिते आहे.

# टाक्याचे घाव सोसल्याशिवाय देवपण नाही!

## कविता भोंगाळे-कडू-पाटील : शिक्षण-राजकीय क्षेत्रातील प्रेरणादायी वाटचाल



शिखरावर जाण्यासाठी कोणतीतरी वाट शोधावी लागते...चांगल्या यशासाठीसुद्धा थोडी वाट पाहावीच लागते... यश हाती येण्यासाठी कष्ट थोडे करावे लागतात... कष्टाचे फळ हाती येण्यासाठी काही बोल ऐकावे लागतात... या कवितेच्या ओळीप्रमाणे कष्ट केल्याशिवाय फळ मिळत नाही. आपला ठसा वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी थोडे कटू बोल ऐकावेच लागतात. त्याशिवाय कविताताई भोंगाळे-कडू पाटील यांच्यासारखी यशस्वी उद्योजिका घडू शकत नाही. शैक्षणिक, बांधकाम, राजकीय, सामाजिक अशा क्षेत्रात आपला ठसा उमटवणाऱ्या भोंगाळे ताई आजच्या तरूणाईसाठी आदर्श आहेत. मोशीतील योगेश एंटरप्राईजेसचे संस्थापक श्री विनायकराव भोंगाळे पाटील (आई) विजया भोंगाळे यांना तीन आपत्य होती. त्यामध्ये कविताताई, सरिताताई आणि योगेश आहेत. या तिघांना चांगले शिक्षण, संस्कार देण्याचे काम भोंगाळे पाटील दाम्पत्यांनी केले. चांगले शिक्षण आणि संस्काराच्या जोरावर कविताताईंनी पुरुषांचे वर्चस्व असलेल्या क्षेत्रात म्हणजे सिव्हिल इंजिनिअरिंग मध्ये त्यांनी शिक्षण घेतले. दहावीनंतर पिंपरी-चिंचवड पॉलिटेक्निक कॉलेजमधून सिव्हिल इंजिनिअरींग केले. त्यानंतर पुढे डी.वाय.पाटील महाविद्यालयात बी.ई केले.

बांधकाम क्षेत्रातील कामाचा अनुभव घेण्यासाठी कविताताईंनी दुसऱ्यांच्या इथे नोकरीला सुरुवात केली.

कविताताईंना कष्टाचे फळ हाती येण्यासाठी वरीष्ठांचे काही बोल ऐकलेसुध्दा...त्यातून खंबीर झाल्या. दुसऱ्यांच्या इथे नोकरीचा अनुभव घेतल्यानंतर योगेश एंटरप्राईजेसमध्ये जबाबदारी घेतली. वडिलांचा (श्री.विनायकराव भोंगाळे पाटील) यांचा स्वभाव म्हणजे शिस्तप्रिय, नम्रता, प्रामाणिकपणा, कष्टाळू त्यांच्या नियमाप्रमाणे शिस्तीत काम सुरु केले. वडिलांच्या तत्वानुसार काम करत योगेश एंटरप्राईजेस ही संस्था नावारूपाला आणली. याशिवाय तिन्ही भावंड संस्थेची जबाबदारी चोख पध्दतीने पार पाडतात. एकमेकांमधील प्रेम, इतरांविषयीची नम्रता आणि कामातील प्रामाणिकता पाहून या तिन्ही भावंडाच्या संस्काराचे दर्शन होते.

गायत्री इंग्लिश मिडीयम स्कूलमुळे उज्वल भविष्य घडतेय. बांधकाम क्षेत्रातील काम सांभाळताना कविताताईंनी शैक्षणिक क्षेत्राकडेही लक्ष दिले. गायत्री इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये लक्ष देण्यास सुरुवात केली. पिंपरी-चिंचवड शहरातील प्रसिध्द शैक्षणिक संस्था म्हणून गायत्री इंग्लिश मिडीयम स्कूल ॲन्ड कॉलेज चे नाव घेतले जाते. उत्कृष्ट शिक्षणपध्दती... गुणवत्तापूर्ण शिक्षक...शिस्त... चारित्र्य निर्मिती ... विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास ...सांस्कृतिक शिक्षण देणे...आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारे शिक्षण देणे या सर्व गोष्टी गायत्री इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये असल्यामुळे पाल्यांचे उज्वल भविष्य घडते.

कविताताई भोंगाळे-कडू पाटील यांच्यामध्ये समोरच्याला आपलंस करण्याची कला आहे. त्यामुळे संस्थेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांशी कसे वागावे, त्यांच्याकडून काय, कसे काम करावे, त्यांचा सन्मान कसा ठेवावा. त्यांच्या अडीअडचणी जाणून त्या कशा सोडवाव्या हे त्यांना माहित आहे. संस्थेचे एवढे कर्मचारी सांभाळत त्यांच्या समस्या सोडवत जनसंपर्क वाढला.त्यातूनच समाजाचे कामे भोसरीतील लोकप्रिय आमदार महेश दादा लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सोडविण्यास सुरुवात केली. जनसामान्यांच्या समस्या सोडवणे,महिलांच्या समस्या ही कामे त्या मन लावून करतात. त्यांच्या कामाची दखल घेऊन भारतीय जनता पार्टी आणि आमदार महेश दादा लांडगे यांच्या माध्यमातून पिंपरी-चिंचवड जिल्हा कार्यकारिणीच्या चिटणीसपदी संधी मिळाली. काम करताना शहराध्यक्ष शंकर जगताप यांचेही सहकार्य असते. चूल आणि मुल या वर्तुळाबाहेर काम करताना तारेवरची कसरत होते. मात्र पतीची आणि कुटंबाची खंबीर साथ असल्यामुळे शक्य होते. मुलांचे पालनपोषण आईच्या जबाबदाऱ्या पार पाडताना अन् बाहेरचा व्याप सांभाळताना मोठी कसरत करावी लागते. मात्र पतीच्या खंबीर साथीमुळेच लग्नानंतरही या क्षेत्रात यशस्वीरित्या काम करते आहे.

### ... तर महिला सक्षम होतील

महिला सक्षमीकरणाबद्दल सांगयचे तर महिलांना शिक्षण, आर्थिक सहाय्य, रोजगार आणि आरोग्य सेवा देऊन त्यांच्या प्रगतीसाठी पोषक वातावरण तयार करणे आवश्यक आहे. महिलांना सामाजिक-आर्थिक दर्जा प्राप्त करण्यासाठी शैक्षणिक सक्षमीकरण हे एक शक्तिशाली साधन आहे. स्त्रीला शिक्षित करणे केवळ तिलाच नव्हे तर संपूर्ण कुटुंबाला सक्षम बनवते. महिलांना कामाच्या समान संधी उपलब्ध करून देऊन आपण आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकतो.

> नवोदीत महिला उद्योजिकांना एकच सांगू शकते जीवनात सर्वप्रथम स्वतःला ओळखा, प्रतिकुल परिस्थितीत सामर्थ्य शोधा, वेळेचे व्यवस्थापन करा, सर्वप्रथम आरोग्य जपा... करिअर आणि कुटूंब यामध्ये स्पेस ठेवा... क्षेत्र कुठलेही असू द्या प्रामाणिक कष्ट केल्यास नक्कीच यश मिळते.स साजरा माझ्या अस्तित्वाचा...मी रोज करीन साजरा माझ्या स्वातंत्र्यांचा..!
>
> \- कविता भोंगाळे-कडू पाटील, उद्योजिका.



# धैर्याने उभारलेली प्रेरणादायी "स्पार्क"

## डॉ.सुनिता पाटसकर : यशस्वी उद्योजकेची कहानी

एकदा निश्चय केला की माणूस काहीही करू शकतो. याचाच प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे. पतीच्या निधनानंतर खचून न जाता मोठ्या धैर्याने कंपनीची धुरा सांभाळत घेतलेली भरारी अनेकांना प्रेरणा देऊन गेली आहे. ही प्रेरणादायी यशोगाथा स्पार्क ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजच्या अध्यक्षा श्रीमती डॉ.सुनीता अशोक पाटसकर यांची आहे.

माझे पती कै.अशोक पाटसकर हे सुरुवातीला ईगल इंजिनियर्स कंपनीत नोकरी करत होते. एकत्रित कुटूबांचा भार त्यांच्यावर होता. शंभर रूपयांच्या पगारातून पाच रूपये शिल्लक ठेवत होतो. अजमेरा पिंपरीमध्ये पहिल्यांदा स्वतःचे घर घेतले. आमच्या मुला-बाळांच्या शिक्षणाचा खर्च सुरु झाल्याने पतीचा पगार कमी पडत असल्याने मी पार्लरचे, शिवणकाम सुरु केले. त्यात काही पैसे मिळण्यास सुरुवात झाली. त्यानंतर कुंडली काढून देण्यास सुरुवात केली. पती अशोक पाटसकर यांनी १९८४ मध्ये स्पार्क इंजिनिअर्स कंपनी सुरु केली होती. पंधरा वर्षाच्या अनुभवावर ही कंपनी सुरु केली होती. लोन घेऊन कंपनीची सुरुवात केली. पती पाटसकर सरांचे काम वाढले. एकाच्या दोन कंपन्या झाल्या. त्यामुळे पहिल्या कंपनीमध्ये पार्लर बंद करून मी जात होते. लोकांशी कसे बोलले पाहिजे. कसे व्यवहार केले पाहिजे, कंपनीचे वर्क कसे मॅनेज केले पाहिजे हे जवळून पाहिले. शिकून घेतले. मुलाचे शिक्षण सुरु होते. मुलाने (अविराज अशोक पाटसकर) डी वाय पाटील मध्ये डिप्लोमा केला डिस्ट्रिंक्शन मध्ये पास झाला त्याच्यानंतर तो पुढं बी मेकॅनिकल च्या शेवटच्या वर्षाला गेला अन् पती आजारी पडले त्यांना कावीळ झाली आणि ती कावीळ पोटात उतरून त्यांचा देहांत झाला. पतीच्या निधनानंतर  दोन्ही कंपनीची जबाबदारी डॉ.सुनीता पाटसकर यांत्यावर पडली.  मात्र मुलगा हाताशी आल्यामुळे दोन्ही कंपन्याकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. साहेब असताना कंपनीचे कामकाज कसे काय हे जवळून अनुभवल्यामुळे खूप जड गेले नाही. मात्र घर आणि कंपनी सांभाळताना तारेवरची कसरत होत होती. कंपनीतील इंजिनिअरचे सगळे जॉब मुलाच्या गळ्यात घातले. आज कंपनी भारतामध्ये एक नंबरला आहे. मुलाला कंपनीत हाताशी घेतल्यानंतर अजून कामाला चांगली सुरुवात झाली. भारताबाहेरसुध्दा कंपनीतून जॉब पाठवण्यास सुरुवात केली. दोन्ही मुलांचे चांगले पालन पोषण केले. २००६ मध्ये मुलीचे लग्न चांगल्या घरात करून दिले. त्यामुळे समाधान मिळते. कंपनीची धूरा सांभाळताना समाजाचे काही देणं लागतो या उद्देशाने सामाजिक कार्यासाठी पाऊल उचलले. आतापर्यंत केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन युनायटेड स्टेट ऑफ अमेरिकेकडून डॉक्टरेट मिळाली. त्यानंतर २ जानेवारी रोजी दिल्ली येथे राष्ट्रीय पुरस्काराने मंत्र्याच्या हस्ते सन्मानित केले. सद्या पुणे विद्यापीठात सिनेट म्हणून काम पाहते.तसेच ग्रीन वर्ल्ड क्लब ची शहरातील पहिली अध्यक्षा आहे. सावित्रीबाई फुले महिला संघटना कनेरसर इथे प्रमुख प्रेरणास्थान व सल्लागार म्हणून मी काम करत आहे. जनता सहकारी बँकेच्या शेअर होल्डर समितीवर मी 1996 पासून आहे. माता पिता संघटना भोसरी याची अध्यक्ष आहे. रयत शिक्षण संस्था औंध आयक्यूएसी ह्याची कायमस्वरूपी अध्यक्षपद आहे. नंतर स्पार्क हास्य क्लब म्हणून हा मी स्वतः चालवते आहे. गेल्या दहा वर्षापासून हास्यक्लब सोबत महिलांना व्यायाम शिकवते.





### कोविडमध्ये कंपनीची मोठी कामगिरी

- कोविड काळात अनेक कुटूंब उध्दवस्त झाली. या कालावधीत अनेकांचे प्राण वाचवण्यासाठी आमच्या कंपनीतून ऑक्सिजनचे टँक तयार केले. प्रशासनाला आणि वैद्यकीय विभागाला मोठा हातभार कंपनीच्या कार्यामुळे झाला. त्याकाळात आमचे कर्मचारी आमच्या सोबत होते. आज कंपनीसोबत साडेपाचशे कर्मचारी आहेत. साडेपाचशे कर्मचाऱ्यांचे कुटूंब कंपनीवर निर्भर आहेत.

जागतिक महिला दिन

> महिला म्हणजे केवळ कुटुंबाचा आधार नसून समाजाची खरी ताकद आहेत. प्रत्येक स्त्रीमध्ये असलेल्या धैर्याने, जिद्दीने आणि आत्मविश्वासाने ती कोणतीही गोष्ट सहज साध्य करू शकते. आपल्या आयुष्यातील आई, पत्नी, मुलगी, बहीण, मैत्रीण किंवा सहकारी यांच्या योगदानाशिवाय आपलं जीवन अपूर्ण आहे. त्यांच्या अथक परिश्रमाने, त्यागाने आणि प्रेमाने संपूर्ण समाज घडतो. महिला केवळ घराची जबाबदारीच सांभाळत नाहीत, तर त्यांनी प्रत्येक क्षेत्रात स्वतःचे एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, कला, क्रीडा, राजकारण, व्यवसाय अशा विविध क्षेत्रांमध्ये त्यांनी स्वतःचा ठसा उमटवला आहे. त्यांचे योगदान केवळ त्यांच्या कुटुंबापुरते मर्यादित नाही, तर त्यांनी संपूर्ण समाजाला आणि देशाला घडवण्याचे महान कार्य केले आहे.
>
> **- उद्योजिका श्रीमती सुनिता पाटसकर, स्पार्क ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजच्या अध्यक्षा**

# कुटुंबियांच्या साथीने गाठले यशाचे शिखर!

## डॉ. प्रियंका संचित लंघे (शिंदे) : मानवता जपणारी संवेदनशील डॉक्टर!



आयुष्यात जोडीदार खूप महत्त्वाचा असतो. जर तुम्हाला आयुष्यात पुढे जायचे असेल तर जोडीदार खूप महत्त्वाची भूमिका बजावतो. असे म्हणतात ना प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एक स्त्री असते. पण सुधा मूर्ती या उलट जाऊन सांगतात की, प्रत्येक यशस्वी स्त्री च्या मागे एक 'समजूदार पुरुष' असतो. असेच मूर्तीमंत उदाहरण डॉ. प्रियंका संचित लंघे (शिंदे) यांचे आहे. नवीन शिकण्याची जिद्द, पती अन् भावाचा पाठिंबा यामुळे लग्नानंतर त्या डॉक्टर होऊ शकल्या. डॉ. प्रियंका संचित लंघे (शिंदे) मूळच्या पनवेलच्या २०१० मध्ये त्यांचा विवाह शिरूरच्या संविदनेमधील डॉ. संचित उमाजी लंघे यांच्याशी झाला. लग्नाआधी त्या पदवीधर होत्या. मात्र त्यांना मेडिकल फिल्डची आवड होती. सासरच्या कुटूंबियांनी पुढे शिक्षण घे स्वतःच्या पायावर उभी रहा असे सांगितले. माझे पती डॉ. संचित यांनी आकुर्डीतील सीएआरसीमध्ये बीएमएसला ॲडमिशन करून दिले. मला शिकण्याची जिद्द होती. त्यामुळे प्रेग्नंट असतानाही शिक्षण पूर्ण केले. गरोदरपणात बाईला आरामाची, सकस आहाराची गरज असते. मात्र, शिक्षण पूर्ण करण्यासाठी फोकस केला होता. शिक्षण पूर्ण करून २०१७ पासून रूग्णसेवा सुरु केली आहे. महिलांच्या आरोग्याच्या अनेक समस्या माझ्याकडे येत होत्या. त्यासाठी पुढे महिला स्त्रीरोग तज्ज्ञ म्हणून फेलोशिप केल. महिलांना त्यांच्या आरोग्याबाबत माहिती अन् जनजागृती केली. साने चौकात कामगा र वर्ग मोठ्या प्रमाणात असल्याने त्या ठिकाणच्या महिलांना मोठ्या हॉस्पिटलमध्ये जाणे परवडत नाही. काही वेळा त्या महिला स्वतःच्या आऱोग्याकडे दुर्लक्ष करतात. आजार अंगावर काढतात. त्यामुळे त्यांच्यात जनजागृती केली. त्यांच्यासाठी माफक दरात आरोग्यसेवा सुरु ठेवली आहे.

कोविडमध्ये साने चौकातील आणि आजुबाजूच्या परिसरातील रूग्णांची सेवा रात्री उशिरापर्यंत थांबून केली.अनेकांना प्राथमिक उपचार ओपीडीमध्ये दिले. या कार्याची दखल म्हणून काही संस्थांनी कोविडयोध्दा म्हणून सन्मानितही केले. इंटरनॅशनल ह्युमन राईट्स असोसिएशनच्या पिंपरी-चिंचवड मेडिकल लिगल चेअरमन पदावर सद्या कार्यरत आहे. माझे प्रेरणास्थान माझा मोठा भाऊ विनय शिंदे आणि पती डॉ. संचित आहेत. डॉ. प्रियंका यांनी २०२५ मध्ये पीजीडीसीसी (POST GRADUCTION DIPLOMA IN CLINICAL COSMETOLOGY AND TRICHOLOGY)यामध्ये शिक्षण घेतले. त्या जनरल फिजिशियन तसेच स्त्रीरोग तज्ज्ञ आणि स्किन स्पेशालिटीसाठी काम करतात. त्यामध्ये त्यांनी एफ आयजीओ(FELLOWSHIP IN GYNAECOLOGY AND OBSTETRICS )मध्ये त्यांचे शिक्षण झाले आहे.

### प्रत्येक स्त्रीने काळजी घ्यावी...

सद्या स्थितीमध्ये अनेक महिलांना मासिक पाळीबाबत समस्या आहेत. त्या समस्या सोडविण्याचे काम करत आहे. प्रत्येक महिलेचे आरोग्य चांगले म्हणजे कुटूंबांचे आरोग्य चांगले राहील. त्यासाठी प्रत्येक स्त्रीने स्वतःची काळजी घ्यावी, मग कुटूंबांची घ्यावी असा संदेश देईल.

> “मी शक्ती, मी अस्तित्व...मी प्रकृति, मी चारित्र्य...मी फक्त मी,तू नाहीस माझ्यात... मी परमात्म्याने बनवलेली, अखंड सामर्थ्य... का करू मी एकच दिवस साजरा माझ्या अस्तित्वाचा...मी रोज करीन साजरा माझ्या स्वातंत्र्यांचा..!
>
> - डॉ.प्रियंका संचित लंघे (शिंदे) .

# शिक्षण क्षेत्रातील सिद्धहस्त “निर्मल” नारीशक्ती!

## संचालिका निर्मला जाधव : महिला सक्षमीकरणासाठी एकमेकां सहाय्य करू अवघे धरू सुपंथ!







समाजात महिलांचे स्वत:चे भक्कम स्थान निर्माण करण्यासाठी, महिलांना स्वत:कडे आणि समाजाकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहण्याची ताकद मिळावी आणि एकमेकींच्या सहभागाने व सहकार्याने सकारात्मक बदलाकडे एकत्रितपणे पुढे जाता यावं यासाठी चिखलीतील सिध्दिविनायक पब्लिक स्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेजच्या संचालिका निर्मला जाधव यांनी पुढाकार घेतला आहे. ‘एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ’ या संत तुकाराम महाराजांच्या सुंदर वचनाप्रमाणे त्यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी कार्य सुरु केले आहे. सामाजिक, शैक्षणिक आणि महिला सक्षमीकरणासाठी २००५ पासून चिखलीतून सुरुवात केली. ओम सिध्दिविनायक बचतगट सुरु केला. त्याअंतर्गत दीडशे बचतगट स्थापन करून, दीड हजार महिलांचे संघटन केले. त्यांना विविध प्रकारचे प्रशिक्षण देऊन स्वतःच्या जागेत व्यवसाय उभारून रोजगार उपलब्ध करून दिला. पापड, शेवया, मसाले, पार्लर, शिवणकाम असे व्यवसाय सुरु करून दिले. परिसरात कामगार वर्ग मोठा असल्याने त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची समस्या होती. याचाच विचार करून २००८ मध्ये प्री-प्रायमरी स्कूल हिरा सामाजिक शिक्षण संस्थेअंतर्गत सुरु केली.

महिलांच्या सबलीकरणाला साथ देत त्यांच्या मुलांना माफक शुल्कात शिक्षण देण्यास सुरुवात केली. सुरुवातीला ५० मुलांनी संस्था सुरु केली. दर्जेदार शिक्षण, गुणवत्ता या गोष्टीमुळे संस्थेने भरारी घेतली. प्रायमरी ते आता बारावीपर्यंत सिध्दिविनायक पब्लिक स्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेजची सुरुवात झाली. अडीच हजार मुले या शिक्षण संस्थेत शिक्षण घेत आहेत.

### शिपायापासून संचालिकापर्यंत “महिला शक्ती”...

सिध्दिविनायक पब्लिक स्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेजमध्ये महिला शिपाई पासून ते संचालिकापर्यंत सर्व महिला उत्तमरित्या कामकाज पार पाडत आहेत. सुमारे ८५ महिला या संस्थेत कार्यरत आहेत. महिलांच्या हाताला रोजगार आणि खऱ्या अर्थाने सक्षमीकरण होते आहे. महिलांनी एकमेकींना समजून मागे राहणाऱ्या महिलेला पुढे आणण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. एक महिला सक्षम झाली तर ती पुढे अनेक महिलांना सक्षम करते. सिध्दिविनायक स्कूलमध्ये प्रत्येक महिला कर्मचारी प्रामाणिकपणे निष्ठेने काम करते. हे सर्व पाहून मला समाधान मिळत असल्याचे सौ. निर्मला जाधव यांनी सांगितले.

# नागरिकांना सुदृढ आरोग्याची 'प्रेरणा'

## डॉ. प्रेरणा गोपाळे : आहाराची जीवनात महत्त्वाची भूमिका



आहार आपल्या जीवनात महत्त्वाची भूमिका बजावतो. सात्विक आहारामुळे आपला दिवस चांगला जातो. अनियमित जेवण, अपुरे भोजन या कारणांमुळे आजाराला निमंत्रण मिळते. डायटेशियन, न्यूट्रिशियन म्हणजेच आहारतज्ञ हे भोजनात सात्विकता आणि पोषक तत्त्व आणण्याचे काम करतात. कोणत्याही व्यक्तीचे आरोग्य चांगले आणि सुदृढ राहवे यासाठी आहारतज्ञ मोलाची भूमिका बजावतो. आहारतज्ञाच्या वेळापत्रकाचे पालन केल्यास शरीरात ऊर्जा कायम राहते आणि आहारात संतुलन राहते. कोणत्या व्यक्तीला कोणत्या घटकाची अधिक गरज आहे, हे सांगण्याचे काम आहारतज्ञ करतात. म्हणूनच नागरिकांच्या सदृढ आरोग्याची काळजी घेण्यासाठी आहारतज्ञांचे महत्त्व जाणून डॉ. प्रेरणा गोपाळे यांनी आरोग्यक्षेत्रात पदार्पण केले. मागील दहा वर्षांपासून त्या नागरिकांच्या सदृढ आरोग्यासाठी सेवा, सल्ला देत आहेत.

डॉ. प्रेरणा गोपाळे या मूळात आयुर्वेदिक डॉक्टर आहे. आयुर्वेदाचे महत्त्व फार पूर्वीपासून आणि आजही अनन्यसाधारण आहे. आयुर्वेदामध्ये हजारो वर्षापूर्वीपासून आहाराचे सखोल ज्ञान आणि सांगड घातली गेली आहे. तसेच स्वास्थ्यवृत्त मध्ये तुमची जीवनशैली कशी असावी योग्य आहार आणि योग्य जीवनशैली असेल तर आपण विविध आजारांना प्रतिबंध करू शकतो याचे विस्तृत वर्णन केलेले आहे. याचेच सर्व शिक्षण डॉ. प्रेरणा यांनी नाशिक येथे घेतले. शिक्षणानंतर आहारतज्ञ म्हणून त्यांनी प्रॅक्टीस केली. त्यानंतर काही वर्षे ठाण्यामध्ये सेवा दिली. राजगुरुनगरमधील अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. अनिकेत गोपाळे यांच्याशी त्यांचा विवाह झाला. त्यानंतर पुण्यामध्ये शिफ्ट झाल्या अन् नागरिकांच्या आरोग्यासोबत हाडांची काळजी घेण्यासाठी या दोन्ही दाम्पत्यांनी सेवा सुरु केली.

### सात्विक आहाराबाबतची सजगता

डॉ. प्रेरणा गोपाळे यांनी आपली सेवा अबालवृध्दांच्या कामी यावी यासाठी काम सुरु केले आहे. योग्य आहार आणि चांगल्या जीवनशैलीचे महत्त्व पटवून देऊन त्यांनी अनेकांचे जीवन सुखर केले आहे. त्यामुळे अनेकांची मधुमेह, उच्चरक्तदाब, थॉयराईड, पीसीओडी या आजारांपासून सुटका झाली आहे. मोशी येथे हेल्थहब क्लिनिकद्वारे त्या नागरिकांना मार्गदर्शन आणि सल्ला देतात. डॉ. प्रेरणा यांचे म्हणणे आहे की, नागरिकांना आरोग्यामुळे कुठल्याही वेदना होऊ नये, ओबीसीटी होऊ नये, त्यातून होणारे आजार पुढील धोका टाळण्यासाठी माझी सेवा महत्त्वाची आहे. शाळा आणि महाविद्यालय, रूग्णालय, व्यायामशाळा, पंचतारांकित हॉटेल या ठिकाणी आहारतज्ञांचे महत्त्व वाढले आहे. यावरून नागरिकांचे सकस आणि सात्विक आहाराबाबतची सजगता वाढत असल्याचे दिसून येते.

### डॉ. अनिकेत यांची साथ...


डॉ. अनिकेत यांचे शिक्षण कोल्हापूरमधील छत्रपतीशाहू महाराज शासकीय विद्यालयात एमबीबीएस पदवी पूर्ण केली. त्यानंतर मोशीतील साईनाथ हॉस्पिटलमध्ये सेवा सुरु केली. काही वर्षे याठिकाणी सेवा दिल्यास पुन्हा आस्था हॉस्पिटलमध्ये सेवा सुरु आहे. मागील आठ वर्षापासून आस्था आणि हेल्थ हब या दोन्ही हॉस्पिटमध्ये हाडांच्या आजारांच्या रूग्णांना ते सेवा देत आहेत. आस्था हॉस्पिटमध्ये त्यांनी सर्व प्रकारच्या अस्थिरोग, मणक्याचे विकार, दुर्बिणीद्वारे होणाऱ्या खुब्याच्या शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडल्या आहेत. सध्याच्या धकाधकीच्या जीवनात अयोग्य जीवनशैलीमुळे हाडांचे विकार असणाऱ्या रूग्णांची संख्या मोठी आहे. त्यांच्यावर माफक दरात उपचार व्हावेत या हेतून डॉ. अनिकेत गोपाळे सेवा देत आहेत. यासोबतच हेल्थहब क्लिनिक एक्सरे युनिट सुरु केले. हाडांचे फॅक्चर तपासले जाते. तसेच संधीवात, गुडघेदुखी यावर उपचार करतात. या दोन्ही दाम्पत्यांनी आरोग्यक्षेत्र निवडून सेवा देण्याचे काम सुरु केले आहे. रूग्णसेवा हीच ईश्वरसेवा मानून त्यांचे निष्ठेने कार्य सुरु आहे.





मातृत्व, कर्तृत्व आणि नेतृत्व
या तिन्ही गुणांचा संगम म्हणजे
"स्त्री"
जागतिक महिला दिन
सर्व माता आणि भगिनींना
जागतिक महिला दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा!
सौ. शितलताई धनंजय वर्णेकर
भाजपा महिला शहर कार्यकारणी,
संचालिका-आयआयबीएम ग्रुप ऑफ इन्स्टयूट


८ मार्च
#WOMEN'S DAY
प्रतिभेला 'तिच्या'
नवे पंख मिळू दे,
प्रयत्नांनी 'तिच्या'
गगन भरारी घेऊ दे!
जागतिक महिला दिन
यानिमीत्त सर्व माता-भगिनींना
हार्दिक शुभेच्छा..!
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार
यश दत्ताकाका साने
दत्ताकाका साने प्रतिष्ठाण
Yash datta kaka sane
Yashsane
+919822 19 9599/+918381 09 9699


'उत्तुंग तुझ्या भरारी
पुढे गगन हे
ठेंगणे भासावे...
तुझ्या विशाल
पंखाखाली
अवघे विश्व वसावे...'
जागतिक
महिला दिन
निमित्त
मनपूर्वक
शुभेच्छा!
श्री. संतोष रमाकांत सौंदणकर
सदस्य महाराष्ट्र राज्य विद्युत सनियंत्रण समिती, पुणे जिल्हा
प्रादेशिक सल्लागार - महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी व अभियंता सेना
उपाध्यक्ष- पिंपरी चिंचवड अहिर सुवर्णकार समाज


8 मार्च
दुष्ट संहारक आदिशक्ती तू,
सत्याची ज्वलंत मूर्ती तू..
प्रयत्नांना लाभलेली उन्नती तू,
आजच्या युगाची सावित्री तू..
प्रेम, त्याग, मायेची सावली तू,
घरसंसाराची माऊली तू..!
जागतिक
महिला
दिन
शिवसेना
श्री. रवि बाबासाहेब लांडगे
• जनसेवक •

# किती संघर्ष कितीहि वेदना..; परि विजेता जिचे नाव वंदना!




## पिंपरी-चिंचवडमधील उद्योजिका श्रीमती वंदना चौव्हाण यांचा दैदीप्यमान जीवनप्रवास

“शं भर लढाया एकाच वेळी तोंड देत जगते आहे... किती घाव किती वेदना तरीही ती उभी आहे... नकार कितीदा सोसला, कितीदा आतून कोलमडली... तरीही नात्यांना सांभाळत कितीदा ती असेल रडली...” या ओळीप्रमाणे महिलांना आयुष्य जगताना अनेक संकटांना तोंड द्यावे लागते. मानअपमान सहन करावा लागतो, तरीही कोलमडून न जाता खंबीरपणे समस्येवर मात करून स्त्री लढते. खऱ्या अर्थाने समाज घडविण्यासाठी स्त्रिया या समाजाचा कणा आहेत. म्हणूनच स्त्रियांच्या पाठीशी उभे राहून सक्षमीकरणाबाबत आपण सर्वांनीच अधिक जागृत होण्याची, एकमेकींना साथ देण्याची खरी गरज असल्याचे इलेक्ट्रीकल इंजिनिअर तथा व्हीईसी डिझाईन स्टूडिओच्या संचालिका श्रीमती वंदना चौव्हाण यांनी सांगितले.

नागपूरमधून अनोख्या शहरात आपले अस्तित्व, वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी श्रीमती वंदना चौव्हाण २००५ मध्ये आल्या. इंजिनिअर म्हणून एखाद्या मोठ्या शहरात स्वत:चे विश्व निर्माण करण्याची त्यांची इच्छा होती. त्यानुसार नवीन पर्व निर्माण करण्यासाठी पिंपरी चिंचवड शहराची निवड केली. आणि तिथून पुढे खऱ्या अर्थाने कार्यास सुरुवात झाली. अपयशांन खचण, हरण, माघार घेणं हे त्यांच्या रक्तातच नव्हत; जे काही करायचं ते स्वत:च्या हिमतीवर... याच ध्येयांन धडप़ड सुरु ठेवली अन् अखेर यश गवसलं.

रूळलेल्या वाटेवरून न जाता आपली वेगळी वाट शोधण्याची धडपड केली. पुरुषांची मक्तेदारी असणाऱ्या इलेक्ट्रीकल क्षेत्रात स्वतःच अढळ स्थान निर्माण केले. २००६ पासून पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत वेगवेगळ्या कंपनीमार्फत काम करत शेवटी २०१४ मध्ये स्वतःसाठीच काम करायचं या उद्देशाने स्वतची मे. वैष्णवी इलेक्ट्रिकल सल्ल्यागार म्हणजेच M/S VEC DESIGN STUDIO नावाने कंपनी सुरु केली. शहरातील महत्त्वपूर्ण जसे की भक्ती शक्ती उड्डाण पूल, शिंदेवसती रेल्वे उड्डाण पूल, बोपखेल उड्डाण पूल असेल अश्या अनेक प्रकल्पामध्ये योगदान दिले, त्यातीलच सध्या LED GARDEN म्हणून प्रसिद्ध असलेल्या अटलबिहारी वाजपेयी उद्यान या प्रकल्पातील सर्व लाईंटीगचे कामकाज श्रीमती वंदना चौव्हाण यांनी पूर्ण केले. तसेच हरिद्वार येथील महाकुंभ मेला २०२१ मध्ये हि विदूत रोषणाई चे काम यशवीरित्या पार पाडले. त्यापुढे औरंगाबादमधील G20 साठी मुख्य ठिकाणं लखलखून टाकण्याचे काम त्यांनी केले, ज्या कामाची प्रशांशा माननीय पंतप्रधान यांनी हि केली व या कामगिरीबद्दल पुरस्कार हि मिळाला. तसेच महाराष्ट्रीतील मुंबई, नागपूर, कोल्हापूर येथे महत्वपूर्ण ठिकाणी कामे पूर्ण केलेली आहे. भारतातील पहिल्या अत्याधुनिक अश्या १3D तंत्र्ध्यानातून सादर होणारी ऐतेहासिक कलाकृती दालन चे लोकार्पण मा. मुख्यमंत्री यांचे हस्ते लोकार्पण झाले.

## अन्यायाविरुध्द लढा द्या...

विचार मले पटते, खरं सांगतो बाईच बाईच्या जिवावर उठते...माणसानं म्हणतात मागं ठेवल्या बाया,पण एका हातानं सांगा वाजतात का टाया...बाईचं सुख पाहुन बाईच आतून पेटते... खरं सांगतो बाईच बाईच्या जिवावर उठते... बहिणाबाईच्या कवितेच्या ओवींप्रमाणे सत्य परिस्थिती आहे. माफ करा पण स्पष्टच बोलते आहे, समाजामध्ये काम करत असताना, अनेकदा पाहिले आहे, एखाद्या स्त्रीवर स्त्रीमुळेच अत्याचार झालेला आहे. क्वचित ठिकाणी पुरुषही कारणीभूत असतात. हे चित्र बदलले पाहिजे. स्त्री मध्ये स्पर्धा असायली हवी पण शत्रुता नसावी. स्त्री स्वतःच खूप भक्कम आहे आणि कुटूंबात, समाजात काम करत असताना स्त्रियांनी एकमेकींना साथ दिल्यास कोणाच्या आधाराची गरज ही लागणार नाही, महिला सक्षमीकरणासाठी हा महत्त्वाचा बदल आवश्यक आहे.



“फार पूर्वीच्या काळापासून आपण बघतोय कि एक स्त्री किती सक्षम आहे, अनेक उदाहरण देता येईल, आई जिजाऊ, राणी लक्ष्मीबाई, सावित्रीबाई एवढेच काय इंदिरा गांधी... प्रतिकूल वातावरणातून आपली पायवाट शोधून समाजात स्वतःची ओळख निर्माण केलीय व समाजकार्य केलाय . आज तर आपल्याला सर्व सोई सवलती उपलब्ध आहे, तेव्हा त्याच्या योग्य तो उपयोग करून आपण मिळालेल्या स्वत्रांताचा योग्य वापर करून आपल्या कुटूबासोबतच, समाज व देशासाठी आपली चूल नि मुल सांभाळून, स्त्री ची गरिमा सांभाळून काय चांगल समाजाला देता येईल याचा विचार करणे गरज आहे.”

- श्रीमती वंदना चौहाण, उद्योजिका, पुणे.

## स्त्री-स्वातंत्र्य असावे मात्र स्वैराचार नसावा

आजची स्त्री दुसऱ्यांचे विचार आपल्यावर न लादता, कोणत्याही बंधनात न अडकता आपली स्वप्नं पूर्ण करीत आहे. याचाच अर्थ असा आहे की, महिलांना स्वातंत्र्य दिलं जात आहे आणि ही बाब आपल्या समाजासाठी आणि आपल्या देशासाठी खूप चांगली आहे . ‘नाही’ म्हणणं हा प्रत्येक स्त्रीचा हक्क आहे. स्वतःच्या आयुष्यावर मनुष्य म्हणूनही केवळ तिचाच अधिकार आहे. ही बाब एखादी स्त्री विसरत असेल किंवा तिला उमजलंच नसेल तर त्याची जाणीव करून देणं हे दुसऱ्या स्त्रीचंही कर्तव्य आहे. स्त्री-स्वातंत्र्याचा स्वैराचारही व्हायला नको. सोबतच आपण कितीही पुरुषांच्या खांद्या ला खंद्या लावून काम करीत असलो तरी आपण एक स्त्री आहे याची जाणीव मात्र सदैव ठेवली पाहिजे. भारतीय संस्कुती, आपले संस्कार याच भान ठेवूनच आपली पायवाट पुढे नेवूयात.

## स्त्रियांनीच एकमेकींविषयी आदर ठेवावा...

विचार मले पटते, खरं सांगतो बाईच बाईच्या जिवावर उठते...माणसानं म्हणतात मागं ठेवल्या बाया,पण एका हातानं सांगा वाजतात का टाया... बाईचं सुख पाहुन बाईच आतून पेटते... खरं सांगतो बाईच बाईच्या जिवावर उठते...बहिणाबाईच्या कवितेच्या ओवींप्रमाणे सत्य परिस्थिती आहे. माफ करा पण स्पष्टच बोलते आहे, समाजामध्ये काम करत असताना, अनेकदा पाहिले आहे, एखाद्या स्त्रीवर स्त्रीमुळेच अत्याचार झालेला आहे. क्वचित ठिकाणी पुरुषही कारणीभूत असतात. हे चित्र बदलले पाहिजे. स्त्री मध्ये स्पर्धा असायली हवी पण शत्रुता नसावी. स्त्री स्वतःच खूप भक्कम आहे आणि कुटूंबात, समाजात काम करत असताना स्त्रियांनी एकमेकींना साथ दिल्यास कोणाच्या आधाराची गरज ही लागणार नाही, महिला सक्षमीकरणासाठी हा महत्त्वाचा बदल आवश्यक आहे.